**ठळक बातम्या**

दावोस आर्थिक परिषदेत पहिल्याच दिवशी महाराष्ट्राचे विविध कंपन्याबरोबर साडेचौदा लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार

इलेक्ट्रॉनिक्स निर्यात क्षेत्रात भारत जगातला तिसरा सर्वात मोठा निर्यातदार देश

भारतीय जनता पार्टीचे १२ वे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नितिन नोबीन यांनी स्वीकारला पदभार

बॅडमिंटनपटू सायना नेहवालची निवृत्तीची घोषणा

**आणि**

हिवाळी खेलो इंडिया स्पर्धांना लडाखमध्ये प्रारंभ

**<><><><><>**

स्वित्झर्लंडमध्ये दावोस इथं आयोजित जागतिक आर्थिक परिषदेत कालच्या पहिल्याच दिवशी महाराष्ट्र राज्य सरकारनं विविध कंपन्याबरोबर विक्रमी साडेचौदा लाख कोटी रुपयांच्या गुंतवणूक करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. याअंतर्गत स्वाक्षरी केलेल्या १९ सामंजस्य करारांमुळे विविध क्षेत्रांमध्ये १५ लाखांहून अधिक रोजगाराच्या संधी निर्माण होण्याचा अंदाज आहे. हे करार राज्याच्या विकसित महाराष्ट्र २०४७: व्हिजन आणि पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याच्या महत्त्वाकांक्षी ध्येयाशी सुसंगत आहेत, असं राज्य सरकारच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. महाराष्ट्र भारतातली गुंतवणुकीसाठी सर्वात चांगली जागा असल्याचं मुख्यमंत्र्यांनी परिषदेत सांगितलं.

- **- -होल्ड - मुख्यमंत्री - बाईट - -**

यावेळी राज्य शासनाने नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात योकी ग्रीन एनर्जी प्रा. लि. यांच्याबरोबर चार हजार कोटी रुपयांचा करार, लोढा डेव्हलपर्स लिमिटेड बरोबर एक लाख कोटी रुपयांचा करार, अन्न आणि कृषी क्षेत्रात कार्ल्सबर्ग यांच्याबरोबर ५०० कोटी रुपयांचा करार, विदर्भामधे पोलाद क्षेत्रात सुरजागड इस्पात लिमिटेड बरोबर २० हजार कोटी रुपयांचा करार, तर लॉजिस्टिक्स क्षेत्रात एमएमआरडीए आणि एसबीजी ग्रुप यांच्यात २० अब्ज डॉलर्सचा करार करण्यात आला.

आगामी दोन दिवसात दावोसमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम कंम्प्युटींग, डीजिटल सोयीसुविधा, फिनटेक, लॉजिस्टिक्स अँण्ड इन्फ्रास्ट्रक्चर तसंच जहाज बांधणी, ईव्ही, अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातील आणखी काही उद्योग घटकांशीही गुंतवणुकीचे सामंजस्य करार होणार आहेत. त्यादृष्टीने त्यांच्या प्रतिनिधींशी, चर्चेच्या फेऱ्या सुरू आहेत.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीत संयुक्त अरब अमिरातीचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांच्याशी शिष्टमंडळ स्तरावरील चर्चा केली. या बैठकीदरम्यान, भारत आणि यूएई यांच्यात संरक्षण, अंतराळ, ऊर्जा, सुपरकंप्यूटिंग आणि अन्न सुरक्षा या क्षेत्रांमध्ये अनेक करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या बैठकीनंतर माध्यमांना माहिती देताना परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री म्हणाले की, सामरिक संरक्षण भागीदारी,अंतराळ क्षेत्र आणि त्याच्या व्यापारीकरणासाठीच्या करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यूएईनं भारतात सुपरकंप्यूटिंग क्लस्टरच्या स्थापनेसाठी सहमती दर्शवली आहे. ते म्हणाले की, 2032 पर्यंत द्विपक्षीय व्यापार दुप्पट करून दोनशे अब्ज डॉलर्सपर्यंत नेण्यासही या बैठकीत सहमती दर्शवली आहे. तसंच दोन्ही नेत्यांनी सर्व प्रकारच्या दहशतवादाचा निषेध केला. दहशतवादी कृत्यांना वित्तपुरवठा करणाऱ्या, त्यांना पाठिंबा देणाऱ्या किंवा ती कृत्ये करणाऱ्यांना कोणत्याही देशानं आश्रय देऊ नये, यावर दोन्ही नेत्यांनी भर दिला, असं विक्रम मिस्त्री यांनी सांगितलं.

<><><><><>

अबुधाबी नॅशनल ऑइल कंपनी गॅस आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड यांनी आज नैसर्गिक वायू खरेदी-विक्री करारावर स्वाक्षऱ्या केल्या. सुमारे ३०० कोटी अमेरिकन डॉलर्स मूल्याचा करार येत्या १० वर्षांसाठी लागू असेल. संयुक्त अरब अमिरातीचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झाएद अल नाह्यान यांच्या भारत भेटीदरम्यान या कराराची घोषणा करण्यात आली होती.

<><><><><>

भारतानं २०२५ मधे ४७ अब्ज डॉलर्स म्हणजेच चार लाख १५ हजार कोटी रुपयांची विक्रमी इलेक्ट्रॉनिक्स निर्यात साध्य केली आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी समाजमाध्यमावरुन ही माहिती दिली. पीएलआय

आधारित योजनेतून उत्पादित स्मार्टफोन निर्यातीतून ३० अब्ज डॉलर्सची निर्यात करण्यात आली आहे. आर्थिक वर्ष २०१५ पासून इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंच्या निर्यातीत ११ पट वाढ झाली असून, इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात आता भारत जगातला तिसरा सर्वात मोठा निर्यातदार देश आहे. इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंच्या उत्पादनामुळे महिलांच्या मजबूत सहभागासह २५ लाख नवीन नोकऱ्या निर्माण झाल्या असून एमएसएमईसाठी मोठ्या संधी आणि तरुणांना दीर्घकालीन कौशल्य उपलब्ध झाल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

<><><><><>

दहा युरोपियन देशांवर अतिरिक्त कर लादण्याच्या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या घोषणेच्या पार्श्वभूमीवर युरोपियन युनियनमधल्या देशांनी २२ जानेवारीला आपत्कालीन शिखर परिषद आयोजित केली आहे. ट्रम्प यांच्या घोषणेसंदर्भात युरोपियन युनियन आणि अमेरिका यांच्यात चर्चा सुरू असून युरोपियन युनियनचे आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी आपण वचनबद्ध आहोत, असं युरोपियन कमिशनचे प्रवक्ता ओलोफ गील यांनी म्हटलं आहे. त्याआधी याच मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी युरोपियन युनियनच्या राजदूतांची एक बैठक ब्रुसेल्स इथं झाली.

<><><><><>

नितीन नबीन यांनी आज भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला. नवी दिल्लीत भाजपाच्या मुख्यालयात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत संघटन पर्व या कार्यक्रमात नबीन यांनी सूत्रं स्वीकारली. राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी नबीन यांचा एकट्याचाच अर्ज आला होता. आज संघटन पर्व या कार्यक्रमात निवडणूक निर्णय अधिकारी के. लक्ष्मण यांनी पक्षाचे १२वे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नितीन नबीन यांचं नाव जाहीर केलं. नितीन नबीन हे भाजपाचे आतापर्यंतचे सर्वात तरुण अध्यक्ष ठरले आहेत.

प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी नितीन नबीन यांचं भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन केलं. नितीन नबीन यांच्यावर केवळ पक्षाचीच नाही तर रालोआमधे समन्वय साधण्याची जबाबदारी आहे, नबीन हे देशात राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन पाहणाऱ्या पिढीतले आहेत. याचा फायदा कार्यकर्त्यांना होईल, असं मोदी म्हणाले.

**- - होल्ड बाईट मोदी - - -**

यावेळी मोदी यांनी भाजपाच्या याआधीच्या राष्ट्रीय अध्यक्षांचा आवर्जून उल्लेख केला तसंच त्यांच्या कार्यकाळात पक्षाचा विस्तार झाल्याबद्दल त्यांचं अभिनंदन केलं. माजी राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यांनीही नबीन यांचं अभिनंदन केलं. नबीन यांच्या नेतृत्वात भाजपा प्रगती करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

ऑलिंपिक पदक विजेती सायना नेहवालने बॅडमिंटनमधून निवृत्ती जाहीर केली आहे. गुडघ्याच्या दुखापतीमुळे गेली दोन वर्ष सायना खेळापासून दूर होती. मात्र आता दुखणं बळावल्यामुळे आपण खेळणं थांबवत असल्याचं तिने एका पॉडकास्टच्या माध्यमातून जाहीर केलं. जागतिक क्रमवारीत अव्वलस्थान मिळवणारी ऑलिंपिक पदक जिंकणारी ती पहिली महिला भारतीय बॅडमिंटनपटू आहे.

२०१६ मधे रियो द जानिरो ऑलिंपिकच्या वेळी गुडघ्याला दुखापत झाल्यानंतरही २०१७च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत तिने कांस्यपदक आणि २०१८च्या राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक जिंकलं होतं.

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड क्रिकेटसंघांच्या टी ट्वेंटी सामन्यांच्या मालिकेला उद्यापासून प्रारंभ होत आहे. मालिका ५ सामन्यांची असून  पहिला सामना नागपूरच्या जामठा स्टेडीयमवर होणार आहे. या सामन्यासाठी नागपुरात प्रेक्षक मोठ्या संख्येनं येण्याची शक्यता लक्षात घेता, शहर पोलिसांनी वाहतुकीचं चोख नियोजन केलं आहे. प्रेक्षकांसाठी मेट्रो स्टेशनपासून क्रीडासंकुलापर्यंत फीडर बसची मोफत सुविधा देण्यात येणार आहे.

**<><><><><>**

महिलांच्या प्रीमियर लीग क्रिकेट मधे आजचा सामना दिल्ली कॅपिटल्स आणि मुंबई इंडियन्स मधे होणार आहे. गुजरातमधे वडोदरा इथं आज संध्याकाळी साडे सात वाजता सामना सुरु होईल.

या स्पर्धेत, काल झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघानं गुजरात जायन्ट्स संघाला ६१ धावांनी पराभूत केलं.

**<><><><><>**

सहाव्या ‘खेलो इंडिया - हिवाळी क्रीडा स्पर्धांना लडाखमधे लेह इथं आज सुरुवात झाली. लडाखचे नायब राज्यपाल कवींदर गुप्ता यांनी या स्पर्धांचं उद्घाटन केलं. 21 राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांचे खेळाडू आईस हॉकी तसंच स्केटींगमध्ये भाग घेणार आहेत. यावर्षीच्या स्पर्धेत फिगर स्केटींग या ऑलिंपिक क्रीडाप्रकाराचा समावेश केला आहे.

//<><><><><>//